प्रकरण : चौथे

# शाहूंच्या प्रशासकीय सुधारणा

# शाहूंच्या प्रशासकीय सुधारणा

छत्रपती शाहू महाराजांच्या प्रशासकीय सुधारणांचा आढावा घेत असताना कोल्हापूर संस्थानच्या स्थापनेपासून छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे राज्यसूत्रे येईपर्यंत प्रशासनात कशा पद्धतीने स्थित्यंतरे होत गेली याचा आढावा घेणे आवश्यक ठरते.

इ.स.१७०८ मध्ये महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूर संस्थानची स्थापना केली होती. महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूर संस्थानची स्थापना केल्यापासून १८९४ पर्यंत म्हणजे छत्रपती शाहू महाराज यांनी प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रे हाती घेईपर्यंत कोल्हापूर प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, १७०८ ते १८९४ या कालखंडात कोल्हापूर प्रशासनाचे प्रामुख्याने तीन टप्पे पडतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १७०८ ते १८९४ | ः | प्रशासनाची पारंपारिक पद्धती. |
| २. | १८४४ ते १८९४ | ः | पॉलिटिकल एजंटला पर्यवेक्षणाखालील प्रशासनाची ब्रिटीश पद्धती. |
| ३. | १८९४ ते १९२२ | ः | छत्रपती शाहू महाराज यांचे प्रत्यक्ष प्रशासन [१] |

### १. १७०८ ते १८४४ ः

इ.स.१७०८ ते १८४४ या १३६ वर्षाच्या काळात कोल्हापूर संस्थानात इतर मराठा राज्यकर्त्याप्रमाणे प्रशासनाची परंपरागत पद्धती म्हणजे 'अष्टप्रधान मंडळ' ही पद्धत अनुसरली जात होती. या पद्धतीमध्ये राजा हा राज्याचा प्रमुख असे तर राज्याचा कारभार हा एका मंडळामार्फत चाले. ते राजमंडळ या धर्तीवर ज्यामध्ये अष्टप्रधान म्हणजेच आठ मंत्री समाविष्ट असतं. परंतू पुढे प्रशासनाच्या या पद्धतीवर ब्रिटीश सत्तेचा प्रभाव पडला. तो इ. स. १८१२ मध्ये जेंव्हा राजा शिवाजी दुसरा

१. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 1 (Introduction)

(इ.स.१७६२-इ.स.१८१३) आणि ब्रिटीश यांच्यामध्ये करार होऊन कोल्हापूर संस्थान हे ब्रिटीश शासनाच्या प्रभावाखाली जाऊन 'मांडलिक राज्य' म्हणून उदयास आले.'[२]

'कोल्हापूर व इंग्रज यांच्यामध्ये १ ऑक्टोबर १८१२ रोजी हा करार झाला. या करारावर ८ऑक्टोबर १८१२ रोजी सह्या झाल्या.'[३] या कराराने कोल्हापूरच्या छत्रपतींवर बरीचशी बंधने आली. या करारातील कलम तीन व कलम चार ही दोन महत्त्वाची कलमे होती. कारण प्रामुख्याने याच कलमामुळे कोल्हापूरच्या सार्वभौमत्त्वावर बरीचशी बंधने आली.

तहाच्या तिसऱ्या कलमात छत्रपतींनी कोठेही आरमार अथवा लढाऊ जहाज ठेवू नये अशी स्पष्टच अट घातली होती. शेवटच्या म्हणजेच कलम चार मध्ये छत्रपतींच्या परराज्य विषयक धोरणाचे सर्व स्वातंत्र्य नष्ट झाले. इंग्रजांचा सल्ला घेतल्याशिवाय ते कोणत्याही परकीय सत्तेशी लढाई करू शकत नव्हते. याचा अर्थ करवीर राज्याच्या सीमेबाहेरचे सर्व व्यवहार इंग्रजांनी पहावे व राज्याचा अंतर्गत कारभार छत्रपतींनी आपल्या इच्छेप्रमाणे चालवावा. म्हणूनच हा तह म्हणजे छत्रपतींचे स्वातंत्र्य हिरावून घेणारा दस्तऐवज ठरला.'[४]

अशा प्रकारे इ.स. १८१२ च्या तहाने कोल्हापूर संस्थानामध्ये ब्रिटीशांचा प्रवेश झाला. १८४४ मध्ये ब्रिटीशांचे राजकीय निवासस्थान (Political Residency) कोल्हापूरात स्थापन झाल्यानंतर हळूहळू कोल्हापूर प्रशासनात त्यांनी प्रत्यक्ष हस्तक्षेप करून आपला प्रभाव वाढवला.

---

२. कित्ता

३. गर्गे स.मा. - करवीर रियासत, जो.ये.राणे प्रकाशन, पुणे, जुन १९८०, पृ.क्र.४१८- ४१९

४. कित्ता

२.१८४४ - १८९४ ः

इ.स.१८४४ मध्ये ब्रिटीशांचे कोल्हापूर येथे राजकीय निवासस्थान स्थापन झाल्यानंतर जेंव्हा १८४५ मध्ये मेजर डी.सी.ग्रॉहम यांची प्रिन्स शिवाजी तिसरा यांच्या कालखंडात राज्यकारभार पार पाडण्यासाठी राजकीय अधिक्षक (Political Residency) म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्याने ब्रिटीश पद्धतीवर आधारित प्रशासनाचे नवीन मॉडले कोल्हापूर संस्थानाला लागू केले.'[५]

या पद्धतीने कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार चालत असताना कोल्हापूर संस्थान व ब्रिटीश शासन यांच्यामध्ये इ.स.१८६२ मध्ये करार झाला.या १८६२ च्या करारान्वये कोल्हापूर दरबार आणि ब्रिटीश सरकार यांच्यामधील संबंधाचा पाया घातला गेला.'[६]

या १८६२ च्या करारातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

१. राज्यापासून खाजगी (Khasgi) ही स्वतंत्र केले जावे .
२. सर्व कर्ज फिटेपर्यंत जमीन व खेड्यासाठीची नवीन अनुदाने देऊ नयेत.
३. सरंजामशाही जहागीरदार पद्धतीतील न्यायालयीन शेषाधिकार ब्रिटीश सरकारच्या अधिष्ठित व्हावा.
४. मोठ्या शिक्षेस सरकारची मंजुरी घेण्याचे बंधनकारक राहील.
५. सर्व महत्त्वाच्या बाबींसंबंधी सल्ला घेणे राजास बंधनकारक राहील.'[७]

अशा प्रकारे विविध अटी लादून कोल्हापूरच्या छत्रपतींवर जितकी बंधने लादता येतील तितकी बंधने लादून छत्रपतींची नामुष्की करण्याचा प्रयत्न केला.

---

५. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894- 1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1984 Page No.- 2 (Introduction)
६. कित्ता
७. कित्ता

ब्रिटीश शासन पद्धतीवर आधारित प्रशासनाचे एक नवे मॉडेल कोल्हापूर संस्थानास लागू करण्यात आले. या नव्या पद्धतीमध्ये शिवाजी चौथा यांच्या कारकीर्दीत Regency Council ची स्थापना करण्यात आली. चौथ्या शिवाजी महाराजांची शारिरीक व मानसिक स्थिती योग्य नसल्याने त्यांच्या वतीने संस्थानचा राज्यकारभार चालविण्यासाठी या Regency Council ची स्थापना करण्यात आली होती.

या रिजन्सी कौन्सिलमध्ये तीन सदस्य होते. त्यामध्ये दिवाण, मुख्य न्यायाधिश, मुख्य महसूल अधिकारी यांचा समावेश होता. याशिवाय रिजन्सी कौन्सिलमध्ये Political Agent या चौथ्या सदस्याचा ही समावेश होता.[८]

२ एप्रिल १८९४ च्या राज्यरोहण समारंभाने छत्रपती शाहू महाराजांकडे राज्यसूत्रे येईपर्यंत हे रिजन्सी कौन्सिल कार्यरत होते.

**३. १८९४ ते १९२२ :**

२ एप्रिल १८९४ नंतर छत्रपती शाहू महाराज यांचा राज्यकारभार सुरू झाला. राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच छत्रपती शाहू महाराज यांनी 'रिजन्सी कौन्सिल' बरखास्त झाल्याची घोषणा करून २ एप्रिल १८९४ पासून करवीर राज्याच्या सर्वाधिकाराचा स्वीकार केला आहे अशी घोषणा केली.

राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर सुरूवातीपासूनच छत्रपती शाहू महाराज यांनी दुर्बल घटकांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले होते. लोककल्याणकारी राज्य कारभार करून राज्यातील सर्वसामान्य जनतेचा सर्वांगीण विकास करणे हे त्यांच्या राज्यकारभाराचे प्रमुख उद्दिष्ट होते.

राज्यकारभारास सुरूवात केल्यानंतर प्रकरण २ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे प्रत्यक्षात महाराजांच्यासमोर अनेक अडचणी होत्या. जसे...

---

८. कित्ता

१. लोकांच्या नजरेत पोलिटिकल एजंटचा प्रभाव होता. कारण सुमारे दोन पिढ्या त्याने कोल्हापूरची अनियंत्रित सत्ता उपभोगली होती.

२. कोल्हापुर संस्थान हे 'मांडलिक राज्य' असल्याने त्यांना ब्रिटिश राज्यसत्तेच्या मर्यादेतच राज्यकारभार करावा लागे. कोल्हापूरच्या राजाचा संबंध हा फक्त अंतर्गत प्रशासनाशी होता. बाह्य प्रशासनाचा कारभार पोलिटिकल एजंट सांभाळीत होता.

३. ५० वर्षाच्या काळातील रिजन्सी कौन्सिलच्या अंदाधुंदी भ्रष्टाचारी कारभारामुळे कोल्हापूरची प्रतिमा खालावलेली होती.

४. प्रशासनात ब्राम्हण, पारशी युरोपियन यांचेच वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्यामुळे स्थानिक सामान्य माणूस प्रशासनातून बाहेर फेकला गेला होता.

अशाप्रकारे प्रत्यक्ष प्रशासनाची सूत्रे जरी महाराजांकडे आली तरी वरीलप्रमाणे महाराजांसमोर प्रमुख अडचणी होत्या.

या सर्व परिस्थितीवर महाराजांना ताबा मिळवायचाच होता. शिवाय विविध योजना आपल्या संस्थानात राबवून प्रशासनात कार्यक्षमता, नाविन्यता महाराजांना आणावयाची होती.

१८९४ ते १९२२ या २८ वर्षाच्या कालावधीत छत्रपती शाहू महाराज यांनी प्रत्यक्ष राज्यकारभाराची धोरणे राबवत असताना जाणीवपूर्वक समाजातील सामान्य माणसांमध्ये व समाजाच्या मागास घटकांमध्ये त्यांचेशी जवळीक निर्माण करून आत्मविश्वास निर्माण केला.

प्रशासनामधून भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि जातीयवादी तत्त्वांना भिरकावून देण्यासाठी राजर्षी शाहूंनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. जी माणसे लोकांची सेवा करण्याऐवजी त्यांना लुबाडत होती. अशा मंडळीच्या विरूद्ध शाहू उभे राहिले. त्यांनी प्रशासनातील कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तीचे पालन करण्यासाठी अनेक कायदे संमत

केले. कर्मचाऱ्यांची भरती, पदोन्नती, बढती, रजा, प्रशासकीय भाषा याकरिता अनेक तरतूदी केल्या.

त्यांनी उच्च पातळीवरील ब्रिटिश अधिकाऱ्यांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करून अनेक योजना व प्रकल्प राबवून लोकांमध्ये आर्थिक-सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी प्रशासनात सुधारणा घडवून आणल्या.

प्रशासकीय कार्यक्षमता, संस्थानाची सामाजिक, आर्थिक प्रगती, सामान्य माणसाचे उत्थान ही प्रमुख सूत्रे छत्रपती शाहू महाराजांच्या प्रशासकीय सुधारणेपाठीमागे होती.

छत्रपती शाहू महाराज यांनी राज्यकारभार हाती घेतल्यापासून विविध स्तरावर प्रशासनात ज्या सुधारणा घडवून आणल्या त्यांचा आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

## शाहूंच्या प्रशासकीय सुधारणा :

छत्रपती शाहू महाराजांनी निरंकूश नोकरशाहीवादी जुल्मी राजकीय व्यवस्था बदलून त्यासंबंधातले सक्त आदेश काढून यापद्धतीची जुल्मी सत्ता राज्यात असणार नाही याची दक्षता घेतली. त्याऐवजी कोल्हापूर संस्थान स्वायत्त पद्धतीने नोकरशाहीच्या जुल्मी व्यवस्थेला पर्याय म्हणून लोकाभिमुख आणि कार्यक्षम प्रशासन देऊन स्वच्छ, पारदर्शी, कार्यक्षम अशा कार्यप्रणालीची सुरूवात राजर्षी शाहूंनी करून पुढील विविध प्रकारच्या प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या. या प्रामुख्याने

१. मुलकी प्रशासन

२. महसूल प्रशासन सुधारणा

३. न्यायालयीन प्रशासकीय सुधारणा

४. सामाजिक

५. शेती, व्यापार आणि उद्योगधंदे याविषयीच्या प्रशासकीय

सुधारणा या प्रमुख सुधारणांतर्गत पुढील प्रकारचा प्रशासकीय सुधारणा घडवून महाराजांनी लोकाभिमुख लोकशाही शासनप्रणाली आपल्या संस्थानात आणली. नोकरशाहीचे वर्चस्व बरखास्त करून लोकाभिमुख प्रशासन करण्याचा प्रयत्न केला.

## प्रत्यक्ष प्रशासनाची सुरूवात :

राज्यकारभाराची सूत्रे हाती आल्यानंतर लगेचच छत्रपती शाहू महाराजांनी जुने 'कौन्सिल ऑफ रिजन्सी' ची अधिकार सत्ता काढून घेऊन त्या जागी 'कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' निर्माण केले.[९]

राजप्रतिनिधी मंडळाचे राज्यकारभाराचे हक्क रद्द करून राज्यकारभाराची सूत्रे शाहूंनी स्वत:च्या हाती घेतली. 'या कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' मध्ये तीन सदस्यांचा समावेश होता. यामध्ये दिवाण, सरन्यायाधीश, महसूल अधिकारी (सरसुभे) यांचा समावेश होता. या तीन प्रमुख अधिकाऱ्यांच्या या सल्लागार समितीचे अध्यक्षपद त्यांनी दिवाणाकडे दिले."[१०]

वास्तविक विभाग प्रमुखांकडून मांडलेल्या बाबींवर आणि 'कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनची मते आल्यानंतर अंतिम आदेश शाहू महाराज देत असत. शाहू महाराजांनी व्यक्तीश: प्रशासनातील सर्व बाबींवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवून ते संस्थानातील सर्वोच्च व अंतिम सत्ता असल्याचे स्पष्ट केले. अशाप्रकारे शाहू छत्रपतींनी 'रिजन्सी ॲडमिनिस्ट्रेशन' पूर्ण नष्ट करून प्रत्यक्ष प्रशासनाची व्यवस्था निर्माण केली.[११]

१८८४ ते १८९४ या ५० वर्षापर्यंतच्या काळात सत्ताधारी राज्यकर्त्याच्या अभावी अनेकांच्या महत्त्वाकांक्षेला व चढेलपणाला जोर चढला होता. आपण स्वत:च

---

९. कित्ता - पृ.क्र.६ (Intoduction)
१०. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९
११. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 6 (Intoduction)

संस्थानचे सर्वेसर्वा आहोत अशी त्यांची समजूत बनली होती. तेव्हा त्यांच्या या उद्धट, बेपर्वा वागण्याला लगाम घालणे आवश्यक होते. शिवाय या लोकांना त्यांच्या अधिकार कक्षेची मर्यादाही दाखवून देणे अत्यावश्यक असल्याने शाहूंना हे पाऊल उचलणे गरजेचे होते. हे पाऊल उचलून शाहूंनी संस्थानची सर्वोच्च अंतिम सत्ता स्वत:कडे असल्याचे दाखवून दिले.

## हुजूर ऑफिसची निर्मिती :

नोकरशाहीच्या हातून राजाने सत्तासूत्रे घेतली तरी प्रशासन यंत्रणा काबूत आल्याशिवाय या सत्तांतराला काही अर्थ नव्हता. तेव्हा प्रशासन यंत्रणेवर वचक बसविण्यासाठी व खऱ्या अर्थाने सत्ताधीश होण्यासाठी शाहूंनी 'हुजूर कार्यालयाची' स्थापना केली.[१२]

प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच १४ एप्रिल १८९४ रोजी शाहू छत्रपतींनी नवीन कार्यालय सुरू केले. त्याला 'हुजूर ऑफिस' असे नाव दिले होते. राज्याच्या संपूर्ण कारभाराचे परिक्षण करण्यासाठी हे सचिवालय होते. या कार्यालयाचा मुख्याधिकारी हा 'हुजूर चिटणीस' वा 'मुख्य सचिव' म्हणून ओळखला जाई.[१३]

त्यात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे राज्यातील अनुभवी व प्रभावी अशा व्यक्तीची 'हुजूर ऑफिस' मध्ये निवड करण्यात आली होती. राजाने दिलेले सर्व आदेश निर्णय हे हुजूर चिटणीसच्या सहीने बाहेर येत. पण हुजूर चिटणीसाने राजाच्या आदेशानेच सही करणे बंधनकारक होते.

शाहूंची ही कृती म्हणजे नोकरशाहीच्या अभेद्य आघाडीला लावलेला सुरूंगच होय. खात्रीच्या माणसाशिवाय कार्यसिद्धी होत नसते. हे जाणून शाहूंनी अत्यंत

---

१२. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९

१३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 6 (Intoduction)

जबाबदारीच्या हुजूर चिटणीसपदी आचार्य फ्रेजर यांच्या सल्ल्यानुसार रघुनाथ व्यंकोजी सबनीस यांची नेमणूक केली होती.[१४]

शाहू छत्रपतींनी चिटणीसपदासारख्या अत्यंत मोक्याच्या व अत्यंत महत्त्वाच्या पदावर सबनीसांची नियुक्ती करू नये म्हणून करवीरस्थ ब्रम्हवृदांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती. तथापि त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. हि नियुक्ती करून शाहू छत्रपती थांबले नाहीत तर सर्व शासकीय कारभारावर देखरेख ठेवण्याचे आणि छत्रपतींनी काढलेल्या हुकुमांवर हुजूर चिटणीस म्हणून सह्या करण्याचे अधिकारही त्यांनी आज्ञापत्रांद्वारे सबनीसांना दिले होती.'[१५]

शाहूंनी हुजूर कार्यालयात जी माणसे भरली ती सर्व वेचक आणि आपल्या खात्रीची. राज्यकारभारावर ताबा आणि प्रशासन यंत्रणेवर वचक ठेवण्याच्या दृष्टीने असे जबरदस्त महत्त्वाचे पाऊल उचलले होते.

## फिरतीवरील अधिकाऱ्यांवर निर्बंध :

राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर १२ व्या दिवशी म्हणजे १४ एप्रिल १८९४ रोजी लोककल्याणाची ग्वाही देणारी एक अतिशय महत्त्वाची राजाज्ञा छत्रपती शाहू महाराजांनी काढली.

पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनुसार शिकारीसाठी आलेले सर्व सरकारी अधिकारी, राजा वगैरेची व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित प्रदेशातील स्थानिक अधिकाऱ्यांवर सोपवली जात असे. या शिकारीची संधी साधून संबंधित प्रदेशातील स्थानिक अधिकारी कुलकर्ण्यापासून ते मामलेदारापर्यत सर्व अधिकरी स्थानिक जनतेकडून धान्यापासून कोंबडी, भाजीपाला इ. सर्व वस्तू फुकटात आणत असत. तसेच गरजेपेक्षा जादा वस्तू आणून स्वत:ची तुंबडी भरून घेत.

---

१४. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क. ६९

१५. कित्ता - पृ. क्र. ७०

लोकांची आर्थिक पिळवणूक हे लोक करत असत. निरकूंश राजसत्ता असल्याने हे लोक उद्दाम बनले होते. भ्रष्टाचार सर्व विभागात फोफावला होता. भ्रष्टाचाराला सोकावलेल्या शासकीय सेवकांवर वचक बसविण्यसाठी आणि लुटल्या जाणाऱ्या प्रजेला थोडासा दिलासा देण्यासाठी शाहूंनी पुढील राजाज्ञा काढली. ती पुढीलप्रमाणे...

आज्ञापत्रात म्हटले होते की, "शिकारी मंडळींनी आपल्याबरोबर तांदूळ, डाळ, गहू, ज्वारीचे पीठ, साखर आणि मसाल्याचे जिन्नस घ्यावेत. नियोजित शिकारस्थळी एक माणूस अगोदर पाठवून तेल, मीठ, मिरची, कांदा, लसूण, भाजीपाला ...... सर्पणादी तद्वतच घोडी, खेचरे, बैल, उंट आणि हत्ती आदींसाठी गवत, काडी, भरडा, भुसा, कणीकोंडा ......... आदी सर्व आवश्यक वस्तूंची खरेदी करावी. जंगल व महसूल या खात्यांकडून जो माल घेतला असेल त्या मालाच्या किंमतीचा भरणा करून त्या त्या खात्याची पावती घ्यावी आणि जो माल वाणी, उदमी, कुणबी, कारागीर यांच्याकडून घेतला असेल त्यांची किंमत ज्याची त्याला गावचे पोलिस पाटील किंवा कुलकर्णी यांचे समक्ष देऊन पावती घ्यावी." राजाज्ञेत पुढे नमूद केले होते की, "शिकारीच्या तैनातीची अथवा सरबराई करण्याची कामगिरी पोलिसांवर सोपवू नये."[१६]

हि राजाज्ञा शिकारी अधिकाऱ्यांप्रमाणेच सरकारी नोकरांनाही बंधनकारक होती. महाराजांना आपल्या आदेशात पुढे असे स्पष्ट केले होते की, "फिरती अंमलदारास फिरतीवर असता काही वस्तूंची गरज भासली तर त्या वस्तू त्याने गावकऱ्यांकडून रोख पैसे देऊन विकत घेतल्या पाहिजे व मालाचे पैसे मिळाल्याबद्दल त्या गावकऱ्यांची पावती घेतली पाहिजे.

शाहूंनी केवळ राजाज्ञा काढली असे नाही तर या राजाज्ञेची ते काटेकोरपणे अंमलबजावणीही करत असत ते पुढील उदाहरणांवरून लक्षात येते.

---

१६. कित्ता - पृ.क्र.७१

भुदरगड तालुक्यातील मामलेदार अण्णा मोरे यांनी पडळी येथील पार्वतीबाई यांची कोंबडी पैसे न देता आणली. त्यामुळे छत्रपती शाहू महाराज यांनी या शिपायास बडतर्फ केल्याची राजज्ञा २० डिसेंबर १९०८ रोजी काढली होती.[१७]

वरील बाबी लक्षात घेतल्या असता छत्रपती शाहू यांच्या लोककल्याणकारी, पारदर्शक व कार्यक्षम राज्यकारभाराची प्रचिती येते. शाहू फक्त राजाज्ञाच देत नव्हते तर त्या आज्ञेची काटेकारपणे अंमलबजावणी होते की नाही हे ते स्वत: पाहत असत.

आजच्या संदर्भात या आज्ञापत्राकडे आपण जर दृष्टीक्षेप टाकला तर त्याची उपयोगिता लक्षात येते. सरकारी हुद्दा आणि प्रतिष्ठेच्या जोरावर जे लोक गरीब जनतेला लुबाडत असत त्यांना रोखण्यासाठी शाहूंनी हे आज्ञापत्र काढले होते. ते आजच्या भ्रष्टाचारी सरकारी नोकरांनाही जसेच्या तसे लागू होण्यासारखे आहे.

**पाहणी भेटीचे आयोजन :**

अधिकाऱ्यांच्या अहवालावर आधारलेले जनतेच्या स्थितीचे ज्ञान संपादन करण्यापेक्षा समक्ष जनतेत जाऊन तिची स्थिती, तिचे प्रश्न, तिच्या अडी-अडचणी समजावून घेणे श्रेयस्कर आहे हे जाणून शाहूरायांनी जनतेच्या प्रत्यक्ष भेटीचे आयोजन केले.[१८]

छत्रपती शाहूंनी हे जाणले होते की राज्यात न्याय हा पक्षपाती बनला आहे. गरीब, सामान्य जनतेची प्रशासनात उपेक्षा केली जात होती हे त्यांच्या लक्षात आले होते.

ग्रामीण भागात ग्रामाधिकारी, सावकार, पुरोहित हे ब्राम्हणच असत. ब्राम्हण कारकून, ब्राम्हण वकील, मामलेदारासारखे महसूल अधिकारी हे

---

१७. Sangave Vilas - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-V (1906-1909 A.D.), (Foundation of development project and rise of sedition), Shivaji University, Kolhapur, 1992 Page No.- 20 (Introduction)

१८. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.८१

जरी ब्रिटिशांच्या अधिकाराखाली काम करीत असत. तरी ते वरील ग्रामीण त्रिकूटाला आतून सामील असत. हे ब्राम्हण अधिकारी अपल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या तक्रारी, अर्जातील महत्त्वाचे मुद्दे किंवा संबंधित पुराव्याच्या गोष्टी बेमालूमपणे गाळून टाकत. राज्यकारभारात एकाच जातीचा भरणा आणि वर्चस्व असल्यामुळे न्यायदान व कायद्याची अंमलबजावणी करताना हे ब्राम्हण अधिकारी ब्राम्हण, सावकार व जमीनदार यांच्या बाजूने न्याय देऊन गरीब शेतकऱ्यांना शिक्षा ठोठावीत. अशाप्रकारे राज्यकारभारातील न्याय हा पक्षपाती अन्यायमूलक व भ्रष्टाचारी बनला होता."[१९]

यासाठी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानातील वेग वेगळ्या ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी देण्याची पद्धती अवलंबिली. जनतेच्या वैयक्तिक संपर्कातून त्यांनी त्यांच्या समस्या, अडी-अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

त्या दृष्टीकोणातून त्यांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर १८९४ च्या उन्हाळ्यामध्ये पन्हाळ्याला भेट देऊन त्याठिकाणी स्थानिक प्रशासन कशा प्रकारे कार्य रत आहे याची माहिती घेतली. त्यानंतर पुढच्या वर्षी जानेवारी आणि मार्च १८९५ मध्ये शाहू छत्रपतींनी शिरोळ पेट्यातील खेड्यांना भेटी दिल्या. तसेच पन्हाळा पेट्यातील दूरच्या विविध खेड्यामध्ये दौरे केले. या दौऱ्यापाठीमागील महाराजांचा महत्त्वाचा उद्देश असा होता की, सह्याद्रीच्या रांगेतील आदिवासी लोकांच्या परिस्थितीची पाहणी करणे.[२०]

पुन्हा मार्च आणि एप्रिल १८९६ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानातंर्गत भागातील गडहिंग्लज, भारगोटी, दाजीपूर आणि पन्हाळा पेटा या

---

१९. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००१, पृ.क्र. ४१

२०. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 7 (Introduction)

भागांना भेटी दिल्या. त्या ठिकाणच्या गुन्हेगार जमाती आणि त्याठिकाणी असणारे कैदी यांच्या भेटी घेतल्या.[२१]

या ठिकाणच्या कैद्यांच्या असह्यतेची शाहूंना जाणीव झाली. त्यामुळेच एका महिन्यापेक्षा जास्त दिवस चौकशीविना तुरूंगात डांबून ठेवलेल्या कैद्यांचा तक्ता खुलाशासह प्रत्येक मॅजिस्ट्रेटने दरमहा पाठवावा असे आज्ञापत्र त्यांनी काढले. चौकशीच्या नावाखाली महिन्यानी महिने संशयित गुन्हेगारांना गजाआड कुजवत ठेवण्याच्या अन्यायकारक प्रवृत्तीला व पद्धतीला पायबंद बसला. कैद्यांवर अन्याय होऊ नये याची त्यांनी दक्षता घेतली.

दरोडेखोर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेरडांचा बंदोबस्त शाहूंनी दहशतवादाने केला नाही तर त्यांच्याशी विश्वासाचे व प्रेमाचे संबंध ठेवून त्यांच्यात सुधारणा घडवून आणली.[२२] यावरून प्रेमाने काम होते ते द्वेषाने होत या तत्वावर शाहूंचा असणारा विश्वास प्रकट होतो.

अशा प्रकारच्या दौऱ्यांमुळे शाहूंचा जनतेशी थेट संपर्क येत होता. लोक त्यांच्याशी मन मोकळेपणाने बोलू शकत होते. त्यामुळे लोकांच्या अडी -अडचणी त्यांच्या लक्षात आल्या. त्या दूर करण्याचा योग्य निवाडा करण्यासाठी शाहू परिश्रम घेत होते.

आपला राजा कोल्हापूर सोडून आपल्या अडचणी सोडविण्यासाठी आपल्या पर्यंत येतो याचे अपार समाधान त्यांना होते. या भेटींचा परिणाम असा झाला की, लोकांचा राजावरचा विश्वास वाढला व ते राजाशी अधिक एकनिष्ठ बनले.[२३]

लोकभेटींच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे महाराजांना लोकस्थिती कळली. तशीच त्यांची मन:स्थिती ही कळली. त्यांच्या उणिवा कळल्या, गरजा समजल्या. सांप्रत

२१. कित्ता

२२. सुर्यवंशी कृ. गो. -राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क्र. ८७

२३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 7 (Introduction)

स्थिती पालटणे ही गरजेची गोष्ट आहे व राजा या नात्याने ती आपली जबाबदारी आहे असे शाहूंना वाटले.

## सत्तेची पूनर्स्थापना / जादाचे अधिकार मिळविले :
## (Acquisition of Additional Power)

आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभापासूनच शाहू महाराज १८६२ मध्ये ब्रिटीश सरकार व कोल्हापूर संस्थान यांच्यामध्ये झालेल्या कराराच्या कलम ७ व ८ नुसार लादलेले निर्बंध दूर करून अधिकार सत्तेची पुनर्स्थापना करून राज्याची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी दक्ष होते.[२४]

गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्याचे अधिकार आपणास परत देण्यात यावे अशी विनंती १४ नोव्हेंबर १८९४ रोजी खास खलिता पाठवून मुंबई गव्हर्नरांना शाहूंनी केली होती. तसेच १८६२ च्या तहनाम्यातील कलम आठ मधील शेवटच्या पोट कलमात रास्त दुरूस्ती करून आपल्या अमलाखालील जहागिऱ्यांत फौजदारी गुन्हेगारांना शिक्षा देण्याचे आपले अधिकार पुन्हा आपल्याला मिळावेत, अशी विनंती त्यांनी मुंबई सरकारकडे केली.[२५]

शाहूंची सरकारवरील निष्ठा आणि मुंबई सरकारच्या अधिपत्याखालील संस्थानातील त्यांची प्रतिष्ठा लक्षात घेऊन 'गुन्हेगारांस फाशीची शिक्षा देणे, जहागिऱ्यांतील फौजदारी गुन्ह्यांचे खटले चालविणे आणि जहागिऱ्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणे इ. अधिकार परत मिळण्याबद्दलची महाराजांची उत्कट इच्छा करवीर राज्याची प्रतिमा आणि अन्य बाबी लक्षात घेऊन ३१ मे १८९५ रोजी शाहूंना बहाल करण्यात आले.'[२६]

हे जादाचे अधिकार जे शाहू महाराजांना ब्रिटीशांकडून प्राप्त झाले त्यातून ब्रिटीश सरकारचा शाहू महाराजांवर असणारा विश्वास निर्देशित करतो.

---

२४. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 19843 Page No.- 8 (Introduction)

२५. सुर्यवंशी कृ. गो. -राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क. ८०

२६. कित्ता - पृ. क्र. ९६

## नवीन धोरणे आणि प्रकल्पांची अंमलबजावणी :
(Implemention of New Schems and Project)

छत्रपती शाहू महाराज यांनी राज्य कारभाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर संस्थानची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीची दुरावस्था त्यांच्या लक्षात आली. या परिस्थितीवर मात करून सुधारणा घडवून आणण्यासाठी शाहूंनी नवीन धोरणे व प्रकल्प योजना आपल्या संस्थानात राबविल्या.

संस्थानच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीत विकास घडवून आणणे हा या नवीन धोरणांच्या आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणी पाठीमागे महाराजांचा प्रमुख उद्देश होता.

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी कारकीर्दीच्या प्रारंभीच पहिली दोन वर्षे गरजू लोकांच्या फायद्यासाठी त्यांनी विविधांगी कार्यक्रम राबविले. [२७]

१. वेठबिगारीची जुल्मी पद्धत बंद केली.

२. बाजारपेठेतील ग्राहकांची फसवणूक आणि व्यापाऱ्यांचा भ्रष्टाचार थांबविला.

३. राज्याच्या मालकीच्या चराऊ कुरणात गोर-गरिबांच्या जनावरांना चरण्याची मुभा देण्यात आली.

५. जहागीरदार- इनामदारांनी लवकर कर्जमुक्त व्हावे म्हणून त्यांना कमी व्याजाने कर्ज पुरवठा करण्यात आला.

६. गोरगरीब लोकांच्या आजारी जनावरांना औषध, चारा पाणी यांची खास व्यवस्था केली.

७. काही जंगल अधिकाऱ्यांना चहा-कॉफीच्या लागवडीचा विशेष अभ्यास करण्यासाठी पाठवून त्यांच्याकडून पन्हाळ्याच्या डोंगरावर चहा तर भुदरगड पेट्यात कॉफीचे पीक घेण्याचा यशस्वी प्रयोग राबविण्यात आला.

---

२७. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 19843 Page No.- 8 (Introduction)

८. राज्यांतील उद्योगांची पूर्ण सर्वेक्षण पाहणी करण्यात आली.

९. कोल्हापूर रेल्वे स्टेशन नजीक 'शाहूपुरी' बाजारपेठेची स्थापना करण्यात आली.

१०. गुळाची नवीन बाजारपेठ सुरू केली.

११. शैक्षणिक सुधारणांना वेग यावा म्हणून खास समिती नेमण्यात आली.

१२. राजाराम कॉलेजमध्ये पदवी पर्यंत पूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे अशी व्यवस्था केली.

१३. डोंगराळ आणि जंगल भागातील अदिवासींना राज्याच्या सेवेत नोकऱ्या देण्याची व्यवस्था केली.'[२८]

**ब्राम्हणेत्तरांची भरती :**

राज्यकारभारात समतोल राखण्यासाठी जनतेतील विविध घटकांचे प्रतिनिधी प्रशासनात असावे अशी महाराजांची इच्छा होती. त्या दृष्टीकोनातून छत्रपती शाहू महाराज यांनी ब्राम्हणेत्तरांमध्ये उच्च शिक्षण आणि योग्य पात्रता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. छत्रपती शाहूंच्या कार्यक्षम प्रत्यक्ष कार्यपद्धतीमुळे विविध विभागातील अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांनी राजीनामे दिले. या रिकाम्या झालेला. जागांवर छत्रपती शाहूंनी ब्राम्हणेत्तरांच्या नेमणूक केल्या.[२९]

रावबहादुर रघुनाथ व्यकांजी सबनीस यांची १८९४ मध्ये 'हुजूर चिटणीस' म्हणून नेमणूक करण्यात आली होती. महेरजी भाई कुंवरजी तारापुरवाला यांच्या सेवा निवृत्तीनंतर त्यांची १८९८ ला कोल्हापूर संस्थानचे दिवाण म्हणून नेमणूक केली. संस्थाचे कार्यकारी अभियंता आर. जे. शॅनॉन यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी रावसाहेब दाजीराव अमृत विचारे एल. सी. ई. यांची कार्यकारी अभियंता म्हणून ऑक्टोबर १८९६

२८. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७, पृ. क्र. ७०-७१

२९. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), Early Administrative Reforms Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 9 (Introduction)

मध्ये नेमणूक करण्यात आली. भास्कर विठोजी जाधव यांची १८ जून १८९५ पासून सहाय्यक सरसुभे म्हणुन नेमणुक केली. १८९७ नंतर त्यांची पहिल्या प्रतिचे मॅजिस्ट्रेट (न्यायाधिश) म्हणून नेमणूक करण्यात आली होती. [३०]

महाराजांनी ब्राम्हण म्हणून ब्राम्हणांचा कधीही व्देष केला नाही. बुद्धीमान, विश्वासू नि समाज सुधारक ब्राम्हणांचा कधीच द्वेष केला नाही. उलटपक्षी त्यांना मदतच केली होती. कारण आगरकरांच्या मृत्यूनंतर 'सुधारक' हे त्यांचे साप्ताहिक बंद पडण्याच्या मार्गावर असताना महाराजांनी या पत्रकाला आर्थिक मदत केली होती.

महाराजांच्या विरोधात कटकारस्थान केवळ ब्राम्हणच करत होते असे नाही. कारण ली वॉर्नर यांनी शाहूंना धोक्याची सूचना देताना असे म्हटंले होते की, ब्राम्हणच केवळ कारस्थान करतात असे नाही. तर मराठे व इतर जाती ही कारस्थान करण्यात काही कमी नाहीत.

यावरून असे लक्षात येते की, महाराजांचा कोणत्याही एका विशिष्ट समाजावर कटाक्ष नव्हता. तर धार्मिक व इतर बाबतीत अन्याय व माणुसकीला लाज वाटविणारे वर्चस्व इतरांवर कायम रहावे अशी धडपड करणाऱ्या लोकांना त्यांचा विरोध होता.

## कुलकर्णी वतन बरखास्त :

छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात ग्रामीण भागातील बहुसंख्य जनता ही अज्ञानी, अशिक्षित होती. गावात शिकलेली व्यक्ती म्हणजे गावचा ब्राम्हण किंवा कुलकर्णी. शिक्षित कुलकर्ण्याच्या मर्जीनुसार गावचा कारभार चालत असे.

गावचा प्रमुख पाटील पण तोही अडाणीच. पाटलाच्या व रयतेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कुलकर्णी खोट्या नोंदी, खोटा हिशेब वगैरे भ्रष्ट वृत्तीने यांच्या जमिनी त्यांच्या नावावर व त्याच्या जमिनी आखणी कोणत्या नावांवर

---

३०. कित्ता - पृ.क्र.9 – 10 (Introduction)

असा प्रकार करत असे. गावामध्ये सावकारीही बहुतेक करून कुलकर्णीच करत असे. सावकारीचा धंदा करून वर्षानुवर्षे व्याज, धान्य घेऊन मुळ मुद्दल कायम ठेवून शेवटी जमिनी हडप करणे असे सावकाशाहीचे ही प्रकार चालत. वेठबिगारीही चाले.[३१]

हे सर्व ध्यानात घेऊन व पूर्ण चौकशी करून महाराजांनी दि २ मार्च १९१८ मध्ये कुलकर्णी वतने कायद्याने खालसा करून त्यांच्या जागी तलाठी नेमण्याची कारवाई सुरू केली.[३२]

महाराजांनी कुलकर्णी वतन खालसा केले होते. मात्र कुलकर्ण्यांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनी महाराजांनी काढून न घेता त्यांच्याच ताब्यात ठेवल्या. त्यांना या जमिनीची पूर्ण मालकी दिली होती. त्यांना ही जमीन दुसऱ्याला विकण्याची, हस्तांतरीत करण्याची पूर्ण मुभा दिली होती.

कुलकर्णी नोकरीत नसल्याने छ. शाहू या जमिनी त्यांच्याकडून काढून घेऊ शकत होते. परंतु तसे न करता त्यांनी कुलकर्ण्यांना जमिनीची संपूर्ण मालकी दिली. यावरून छत्रपती शाहूंच्या उदार मनाची कल्पना येते.

१९१८ च्या दरम्यान लोकशाहीची हळूहळू चाहूल लागली होती. बिकानेर, त्रावणकोर वगैरे संस्थानात ग्रामपंचायती स्थापना झालेल्या होत्या. त्याच प्रमाणे आपल्या कोल्हापूर संस्थानात जर ग्रामपंचायती स्थापन झाल्या तर सर्व सत्ता वतनदार कुलकर्णी पद्धतीमुळे कुलकर्णी व त्यांच्या जात भाईच्या हाती जाऊ नये.

यासाठी छत्रपती शाहू महाराज यांनी कुलकर्णी वतन बरखास्त करण्यासाठी हे ठोस पाऊल उचलले होते.

यावरून छत्रपती शाहूंचा लोकशाही दृष्टीकोन दिसून येतो. त्याचबरोबर न्यायाची व समतेची त्यांना असलेली आवड ही प्रतिबिंबीत होते. राजकीय सत्तेत

---

३१. साळुंखे हिंदूराव - छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भंडार, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, जून १९९८, पृ. क्र. १७२

३२. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७, पृ. क्र. २४२

समाजातील प्रत्येक घटकाला प्रतिनिधित्व मिळावे अशी शाहूंची मनस्वी इच्छा होती. तर मूठभर लोकांच्या अल्पजनशाहीला त्यांचा प्रखर विरोध होता.

## पगारी तलाठयाची नेमणूक :

कुलकर्णी वतन बरखास्त केल्यानंतर छत्रपती शाहू महाराज यांनी पगारी तलाठी नेमण्याची नवीन पद्धती सुरू केली. तलाठ्याची नेमणूक करताना तो प्रशिक्षित असावा याची विशेष काळजी घेतली. तलाठयांना प्रशिक्षण देण्यासाठी खास सोयीही करण्यात आल्या.

तलाठ्याची नेमणूक करताना सर्व जाती-धर्मातील लोकांना महाराजांची संधी दिली. त्यामुळे महार, चांभार, धनगर, कुंभार अशा लोकांना त्यांनी तलाठी म्हणून निवडले होते. कुलकर्णी वतन रद्द केले तरी तलाठी पदावर नेमणूक करताना ब्राम्हणाला डावलले नाही. कारण तलाठी पदासाठी १७ ब्राम्हणांनी अर्ज केले होते. त्या सर्वांना सेवेत भरती करून घेतले होते.

तलाठ्यांच्या जागांवर ब्राम्हण व्यक्तीस संधी दिली जात नाही अशी तक्रार कानी आल्यानंतर १५ जुलै १९१८ ला छत्रपती शाहूंनी आपल्या आदेशाद्वारे हे स्पष्ट केले की, तलाठयांच्या जागेवर अमुक एका जातीचे लोक लायक नाही असे ठरविणे योग्य नाही. त्यामुळे सर्वास तलाठी पदासाठी संधी दयावी.[३३]

या तलाठयांच्या जागांवर मागासलेल्या वर्गातील विशेषत: अस्पृश्य वर्गातील लोकांना प्राधान्य द्यावे असा ८ ऑगस्ट १९१८ ला आदेश काढला. त्यामध्ये पुढे स्पष्ट करण्यात आले होते की, तसेच या अस्पृश्य लोकांत ज्यांच्याकडे चांगली पात्रता असेल त्यांना रेव्हेन्यु, जुडीशियल, पोलिस इ. जागेवर नेमावे त्यामध्ये नेमत असताना अस्पृश्य ही सबब ऐकून घेतली जाणार नाही.[३४]

३३. Sangave Vilas. – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VIII (1918 and 1919), (Impetus to social Ligislation and Non-Brahmin Movement Shivaji University, Kolhapur 2001 Page No.- 171

३४. कित्ता - पृ.क्र.१८७

यावरून असे लक्षात येते की, छत्रपती शाहू गुणवत्तेच्या बाबतीत कधीही तडजोड करत नसत. व्यक्तीच्या ठिकाणी एखादी विशिष्ट पात्रता आवश्यक असल्यास छत्रपती शाहू त्यासाठी आवश्यक त्या योग्य उपाययोजना करत असत. तसेच २६ ऑगस्ट १९१९ ला महाराजांनी आणखी एक हुकूम काढला होता. त्यामध्ये असे स्पष्ट केले होते की, "ज्या जातीची लोकवस्ती जास्त असेल.त्या जातीचे होता होईल तो तलाठी नेमावा.महार, मांग, चांभार वगैरे अस्पृश्य जातीच्या लोकांना होईल तितका प्रिफरन्स द्यावा.प्रत्येक पेट्यास ५ व प्रत्येक महालास निदान तीन अस्पृश्य असावेत."[३५]

अशा प्रकारच्या सुधारणांच्या माध्यमातून छत्रपती शाहूंनी मागासलेल्या वर्गांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला.तसेच या मागासलेल्या समाजाचा दर्जा उच्चवर्गीय समाजाचा बरोबरीने वाढावा यासाठी खास प्रयत्न केले.

## 'पाटील दरबार स्कूल' ची स्थापना :

'संस्थानच्या प्रशासकीय सुधारणेमधील महत्त्वाचे पाऊल म्हणून 'पाटील स्कूल' च्या निर्मितीकडे पाहिले जाते.तसेच या शाळेचा उल्लेख 'दिल्ली दरबार शाळा' व 'समन्वयी (Coronation) पाटील शाळा' म्हणून ही केला जातो. ही शाळा स्थापन करण्याचा निर्णय छत्रपती शाहू महाराज यांनी एका ऐतिहासिक दिवशी म्हणजे जेंव्हा दिल्ली दरबार १२ डिसेंबर १९११ ला भरला होता तेंव्हा घेतला.'[३६]

ग्रामरचनेमध्ये आणि व्यवस्थेमध्ये पाटील हा परंपरेने श्रेष्ठ मानला जात असे.एका अर्थी तो खेड्याचा मुख्य अधिकारी असे.तो शेतकरी समाजातील असल्यामुळे गावचा पुढारी मानला जात असे.परंतु हा पाटील वर्ग अडाणी असल्यामुळे कनिष्ठ सेवक कुलकर्णी जो थोडा फार शिक्षित होता तो पाटलाला

---

३५. कित्ता - पृ.क्र.५६४

३६. Sangave Vilas – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VI (1910-1913), (Intitiation of socio economic movements) Shivaji University, Kolhapur 1994 Page No.- 8 - 9

हतबल करण्यास यशस्वी होत होता.[३७] पाटलाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तो पाटलाबरोबर संपूर्ण रयतेची ही लूट करत होता.

तेव्हा पाटलांना सरकारी कामात हुशार करण्यासाठी प्रामुख्याने छत्रपती शाहू महाराज यांनी 'पाटील दरबार स्कूल' ची निर्मिती केली. पाटलाच्या अज्ञानाचा फायदा कुलकर्ण्याला घेता येऊ नये तसेच गावच्या जबाबदाऱ्या, कर्तव्य यांची जाणीव पाटलाला करून देण्यासाठी पाटील स्कूलची स्थापना करण्याचा महत्त्वाचा निर्णय छत्रपती शाहूंनी घेतला होता. या शाळेमध्ये प्रामुख्याने पुढील विषयांचा समावेश होता.

१. पोलिस व गुन्हे कायदे अंमलबजावणीतील मुख्य तत्त्वे व कार्यपद्धती.

२. महसूली कार्य व गाव हिशेब.

३. ग्रामीण आरोग्य व स्वच्छता, राहणीमान सुधारण्यासाठी प्रयत्न.

४. व्याकरणदृष्टया शुद्ध भाषेमध्ये अहवाल लेखक कौशल्य.

५. कोल्हापूर संस्थानच्या ऐतिहासिक, भौगोलिक आणि लोक प्रशासनाची माहिती.[३८]

या पाटील स्कूलमध्ये पहिल्या वर्षी ३४ विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. पाटलांना सरकारी कामात हुशार करणे आणि कुलकर्ण्यांच्या जुल्मी जोखडातून पाटलांची आणि पर्यायाने संपूर्ण जनतेची सुटका करणे हा प्रामुख्याने महत्त्वाचा उद्‌देश होता.

## संस्थानातील नोकऱ्यांमध्ये आरक्षण :

सत्तेमध्ये समतोल निर्माण करणे आणि ब्राम्हणेत्तरांना उच्च शिक्षण व उत्तम पात्रता प्राप्त किंवा साध्य करण्यासाठी प्रोत्साहित करणे या हेतूने छत्रपती शाहूंनी सरकारी नोकरीत आरक्षण जाहीर केले. प्रशासनातील असमतोल दूर व्हावा हा या पाठीमागील प्रमुख उद्देश होता. छत्रपती शाहू महाराज यांनी राज्य कारभाराची सुत्रे हाती घेतली तेंव्हा

---

३७. येडेकर शाम - राजर्षी एक व्यक्तीदर्शन, सतीशचंद्र येडेकर कोल्हापूर पृ. क्र. ३४(विभाग तिसरा)

३८. Sangave Vilas - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VI (1910-1913),(Intitiation of socio economic movements) Shivaji Uni.,Kop. 1994 P. N..- 10 (Introduction)

प्रशासनातील विविध विभागात मोठया प्रमाणावर असमतोल निर्माण झाला होता. छत्रपती शाहूंनी ब्राम्हणेत्तर लोकांमध्ये शिक्षण प्रसारास सुरूवात केली. त्याचप्रमाणे शिक्षित ब्राम्हणेत्तरांची प्रशासनातील विविध पदावर नेमणूकी करण्यास सुरूवात केली.

महाराजांनी ब्राम्हणेत्तर तरूणांच्या भरतीला जरी सुरूवात केली तरी या धोरणाला अपेक्षेइतके यश मिळाले नाही. कारण संस्थानच्या विविध विभागात मोठया प्रमाणावर ब्राम्हणांचे प्रस्थ निर्माण झाले होते. त्यामुळे इतर लोकांना नोकऱ्यांमध्ये पुरेशा जागा उपलब्ध झाल्या नाहीत.

शिवाय लोकांचा शिक्षणाबाबतीतला उत्साह तितकासा दिसून आला नाही. कारण जरी उच्च शिक्षण घेतले तर योग्य संधी व पुरेसा मोबदला मिळेलच याची शाश्वती नव्हती.

तेंव्हा मागासलेल्या समाजामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी आणि मागासलेल्या समाजाला योग्य संधी मिळावी यासाठी छ. शाहू महाराज यांनी संस्थानच्या सरकारी नोकरीतील मोठा भाग मागास वर्गीयांसाठी राखून ठेवला. त्यासाठी २६ जुलै १९०२ ला त्यांनी एक महत्त्वपूर्ण जाहीरनामा प्रसिद्ध केला.

त्यामध्ये असे स्पष्ट केले होते की, हा हुकूम पोहचलेल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जाग्यापैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकांस भराव्या ज्या ऑफिसांमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अमलदारांचे प्रमाण सध्या शेकडा पन्नासपेक्षा कमी असेल तर पुढची नेमणुक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी.

या हुकूमाच्या प्रसिद्धीनंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे तिमाही पत्रक खात्याच्या मुख्यांनी सरकारांकडे पाठवावे.

**सूचना :** मागासलेल्या वर्गाचा अर्थ ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्णाखेरीज करून सर्व वर्ग असा समजावा.'[३९]

३९. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-IV (1900-1905), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988 Page No.-92

ब्राम्हणांच्या नोकऱ्यांमधील वर्चस्वामुळे मागासवर्गीय लोकांना त्यांच्या हक्कांपर्यंत कधीही पोहचता आले नसते. छत्रपती शाहूंच्या या धोरणामुळे समाजातील मागासलेल्या घटकांना योग्य हिस्सा खात्रीलायकरित्या मिळण्यास मदत झाली.

या आरक्षण धोरणाचा सरळ अर्थ संस्थानातील सेवेमध्ये असणाऱ्या जागापैकी निम्म्या जागावर मागासवर्गीयांना प्राधान्य देणे. मात्र नेमणूका करताना व्यक्तीची पदासाठी असणारी पात्रता महत्त्वाची होती. योग्य शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीलाच प्रशासनात सामावून घेतले जात असे.

लोकांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहीत करणे हा या धोरणा पाठीमागील महाराजांचा महत्त्वाचा उद्देश होता. कारण शिक्षण ही सर्व सुधारणांची गुरू किल्ली आहे. असे महाराजांचे ठाम मत होते. यावरून असे लक्षात येते की, बौद्धिक पात्रतेला कमी लेखणे असा या धोरणाचा अर्थ मुळीच नव्हता. गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड करण्यास महाराज तयार नव्हते. मात्र सर्वांना योग्य संधी मिळावी असा त्यांचा अट्टहास होता. त्यासाठीच महाराजांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध करून मागासलेल्या समाजाला पुढे आणण्याचा प्रयत्न केला.

## 'नवीन महाला'ची निर्मिती :

संस्थानच्या दररोजच्या प्रशासनामध्ये शाहू महाराज ग्रामीण लोकांच्या व विशेषत: संस्थानच्या डोंगराळ भागातील लोकांच्या अडचणी दूर करण्यासाठी सतत चिंतेत होते. त्यानुसार प्रशासन अधिकाऱ्यांचे मुख्य कार्यालय त्या क्षेत्रातील ग्रामीण लोकांच्या जवळ किंवा सोयीचे असावे असे महाराजांना वाटत होते.

त्यामुळे पन्हाळा तालुक्यातील लोकांच्या सोयीसाठी की जे मुख्य कार्यालयापासून फार दूर होते. त्यांच्यासाठी छत्रपती शाहू महाराज यांनी १९०१-१९०२ या वर्षामध्ये 'चनवाड' व 'महालकरी' येथे नवीन महालांची उभारणी केली. यामध्ये एका व्दितीय श्रेणीच्या मॅजिस्ट्रेटला फौजदारी व दिवाणी स्वरूपाचे अधिकार देण्यात आले. तसेच किरकोळ कारणासाठी कोर्टाने केलेल्या न्यायालयीन चौकशीसाठी ५० रूपये

इतक्या अल्प किंमतीमध्ये जुळवून घ्यावे असे स्पष्ट करण्यात आले होते.[४०]

## सरकारी कर्मचाऱ्यावरील निर्बंध :

सरकारी कर्मचाऱ्यामध्ये शिस्त, वक्तशीरपणा, कार्यक्षमता निर्माण व्हावी यासाठी महाराजांनी विविध निर्बंध घातले होते.

१. सरकारी कर्मचाऱ्यांनी शिस्त राखावी असा शाहूंचा कटाक्ष होता. काही कर्मचारी त्यांची नेमणूक ज्या ठिकाणी झाली आहे. त्याठिकाणी उपस्थित न राहता कोल्हापुरातच असलेले आढळले तेंव्हा त्यांनी आपल्या वरिष्ठांच्या लेखी परवानगी शिवाय आपले नेमणूकीचे ठिकाण सोडू नये अशी सूचना देणारा आदेश छत्रपती शाहूंनी जारी केला होता.'[४१]

२. परवानगी शिवाय संस्थानच्या बाहेर कुणीही जाऊ नये असा महाराजांचा दंडक होता. परवानगीशिवाय संस्थानाबाहेर जाणारे मग ते कागल संस्थानचे प्रमुख किंवा सेनापती असले तरी त्यांनी लेखी परवानगी घ्यावी असा हुकूम दिला होता.[४२]

३. संस्थानच्या अधिकाऱ्यांने ऑफीसच्या कोणत्याही सामानाचा फिरतीवर खाजगीरित्या वापर करू नये असा महाराजांनी हुकूम दिला होता.[४३]

तसेच महाराजांच्या नजरेस आणखीन एक गोष्ट आली होती की, कार्यालयामधील शिपाई लोकांना त्या त्या संबंधित अधिकाऱ्याण्च्या घरी अधिकाऱ्याचे खाजगी घरगुती स्वरूपाचे काम करावे लागते. सरकारी पैशात फुकट नोकर वापरणे हो एक परंपराच झाली होती. महाराजांना निश्चितपणे खटकणारी ही गोष्ट होती. त्यामुळे त्यांनी सेक्रेटरी दप्तरी हुकूम काढून केवळ सरकारी कामासाठीच सेवक शिपायांचा वापर केला जावा खाजगी अथवा सरकारी

---

| | | |
|---|---|---|
| ४०. कित्ता | - | पृ.क्र.२१ (Introduction) |
| ४१. धाटावकर भास्कर | - | राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश - भाग १ ला, पुरालेख विभाग, महाराष्ट शासन, मुंबई १९८८ पृ.क्र.१९ |
| ४२. कित्ता | - | पृ.क्र.३ (प्रस्तावना) |
| ४३. कित्ता | - | पृ.क्र.२३ |

कामाव्यतिरिक्त त्यांचा वापर करू नये असा सक्त हुकूम दिला.[४४]

४. वरिष्ठांशी उद्धटपणाची वर्तणूक करणाऱ्याला पदावनती व इतर शिक्षा दिल्याची उदाहरणे सापडतात. उदा. कृष्णाजी भोसले (डे. जेलर) याने उद्धटपणाचे वर्तन केल्याच्या कारणावरून त्याचा पगार १0 रू. कमी करून २५ रूपये पगारावर हुजूर खजिन्यात अव्वल कारकून म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर त्याच्या जागेवर हुजूर खजिन्यातील अव्वल कारकून मि. आत्माराम भिकाजी यांस बढती देऊन ३५ रूपये पगारावर डेपुटी जेलर म्हणून नेमण्यात आले.[४५]

सरकारी नोकरी प्रामाणिकपणे करणाऱ्यास वंश परंपरा इनाम जमीन देण्याचे हुकूम महाराजांनी दिले होते.[४६]

५. अपुऱ्या माहितीच्या आधारे व सादर केलेल्या कागद पत्रांतील अपुऱ्या माहितीमुळे वेळेचा अपव्यय होतो. वर्षानुवर्षे कागदपत्रे निकालाची वाट पाहत पडून असतं. हे टाळण्यासाठी महाराजांनी कागदपत्रे प्रथमच सादर करताना सर्व आवश्यक माहिती, मागील संदर्भ यावेत व प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढावी अशा सूचना दिल्या होत्या.[४७] वेळेची बचत व लवकरात लवकर कार्याची पुर्तता व्हावी यासाठी महाराजांनी हा आदेश जारी केला होता.

६. शाहू छत्रपती सरकारी नोकरांच्या वक्तशीरपणाला फार महत्त्व देत होते. कनिष्ठ नोकरच नव्हे तर सर्व वरिष्ठ व कार्यालय प्रमुख यांनीही वेळेवर कार्यालयात हजर राहावे असा महाराजांचा दंडक होता.

२५ ऑगस्ट १९१६ च्या हुकूमाने महाराजांनी असे ठरवून दिले की, ऑफिसमध्ये सकाळी ११ वाजता ऑफिसच्या वेळेत आल्यानंतर आपण आलेली

---

४४. येडेकर शाम - राजर्षी एक व्यक्तीदर्शन, सतीशचंद्र येडेकर कोल्हापूर पृ. क्र. १४(विभाग तिसरा)
४५. धाटावकर भास्कर - राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश - भाग १ ला, पुरालेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८८ पृ. क्र. ७१ - ७२
४६. कित्ता - पृ. क्र. ७३
४७. कित्ता - पृ. क्र. ११६ - ११७ - ११८

वेळ नमूद करून सही करावी त्यानंतर ऑफिसच्या मुख्य अधिकाऱ्याने सही करून ते पत्रक स्टेशन बंगल्यावर हुजूर क्लार्कच्या ऑफिसमध्ये साडे अकरा वाजता अगर तत्पुर्वी पाठवावे. तत्पुर्वी ऑफीसच्या मुख्यांनी आपण स्वत: ऑफिसमध्ये किती वाजता हजर झालो याची नोंद करून सही करावी. पत्रक किती वाजता ऑफिसमधून रवाना झाले त्याची वेळ, मिनिटेसुद्धा लिहून पाठवावी.[४८] हा हुकूम १. जनरल २. मुलकी ३. न्याय या तिंन्ही खात्यांना कळविण्यात आला होता.

७. अधिकाऱ्यांना ऑफीसच्या वेळात कारणाने ऑफीसमधून बाहेर जावे लागल्यास कोणत्या कारणाने किती वेळ ऑफीसमधून गैरहजर रहावे लागले. ही माहिती रोज डायरीत नमूद करावी व मागील दिवसासंबंधीची अशी माहिती पुढील दिवसाच्या डायरीबरोबर सादर करावी असा महाराजांनी हुकूम दिला होता.[४९]

८. सरकारी नोकरांच्या वर्तणुकीविषयी कोणी निनावी अर्ज केल्यास महाराज त्याची दखल घेत नसतं. मात्र अर्जदाराने स्वत:चे नाव घालून अर्ज केल्यास प्रथम तो अर्ज प्रतिज्ञेवर खरा करून घेऊन त्याची चौकशी करत. चौकशी अंती तो अर्ज खोटा ठरल्यास अर्ज करणाऱ्यावर खटला चालवावा असा निर्णय महाराजांनी १९०९ साली घेतला होता.[५०]

यावरून असे लक्षात येते की, कर्मचाऱ्यामध्ये कार्यक्षमता, वक्तशीरपणा, कर्तव्यदक्षता निर्माण व्हावी यासाठी छत्रपती शाहूंनी विविध निर्बंध केले होते.

---

४८. कित्ता - पृ.क्र.११९
४९. कित्ता - पृ.क्र.१२४
५०. कित्ता - पृ.क्र.६०

## प्रशासकीय भाषेसंबंधी तरतूद :

करवीर संस्थानातील दप्तर पुर्वी मोडी लिपीत असल्यामुळे दुर्बोध अर्ज वाचण्यात वेळ व्यर्थ जाई व साधारण शिकलेल्या माणसाला अडचणी येत वगैरे गोष्टी लक्षात घेऊन हुजूरकडे येणारे सर्व अर्ज बालबोध लिपीतच असले पाहिजेत असा नियम प्रथम करण्यात आला. याचा अनुभव चांगला आला व यापासून बरीच सोय होते असे नजरेस आले.[५१] त्यामुळे २५ जुलै १९१७ रोजी सरकारने मोडी लिपी ऐवजी बालबोध मराठी लिपी वापरण्याचा आदेश काढून त्यासंबंधी आवश्यक आदेश ११ ऑगस्ट १९१७ रोजी देण्यात आला.

१. सरकारी सर्व पत्रव्यवहार, कागदपत्रे, हिशेब, पावत्या, रेकॉर्ड व आदेश इ. बालबोध मराठीमध्येच काढावेत. मोडीमध्ये नाही.
२. प्रत्येक शब्द तोडून किंवा स्वतंत्रपणे लिहावा.
३. त्याखाली सही सुद्धा बालबोध मराठीमध्येच करावी.
४. नोंदणी होणारे सर्व दस्तऐवज बालबोध मराठीमध्येच करावेत.
५. व्यापारी हिशेब मात्र मोडीमध्ये ग्राह्य धरले जातील.

हे आदेश सर्व सरकारी कार्यालये, शाळा यांना दिले होते.[५२]

पण काही लोकांना मोडी लिपीचे उच्चाटन मनापासून आवडलेले दिसत नव्हते. काही कारकून बालबोध लिपीतील शब्द तोडून न लिहीता जाणून बुजून मोडी पुन्हा प्रचरात यावी या हेतूने घाणेरडे लिहीत. तेंव्हा ९ नोव्हेंबर १९१७ ला अशा आदेश दिला होता की, अशा कारकुनांना बडतर्फ करण्याचे अधिकार रू. १00 किंवा अधिक पगार असणाऱ्या अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. अशा कारकुनांना पेन्शनवरही हक्क ठेवण्यात आला नव्हता.[५३]

---

५१. Sangave Vilas – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VII (1914-1917), (Implemention of socio polotical schemes) Shivaji Uni.,Kop.1997 P.N. 376 (Introduction)
५२. कित्ता - पृ.क्र.५५
५३. कित्ता - पृ.क्र.४७८

## पेन्शन कागदपत्राच्या पूर्वतयारीबाबतचा आदेश :

छत्रपती शाहू महाराज यांना पेन्शनधारकांना वेळेवर पगारपत्रक व पेन्शन मिळत नसल्याचे निदर्शनास आले. खरे पाहता पेन्शनधारकांचे कागदपत्रे तयार करण्यासाठी सरकारी अधिकारी विलंब करत असतं. परिणामी निवृत्त व्यक्तीला वृद्धपकाळी आर्थिक अडचणी व सर्व प्रकारच्या गैरसोयींना सामोरे जावे लागत होते.

या उशिराच्या कालावधीत बऱ्याच प्रसंगी कर्मचाऱ्यांना ॲडव्हान्स दिली जायची व काहीवेळी बऱ्याच पेन्शनधारकांना मृत्यूच्या संकटालाही सामोरे जावे लागत असे.[५४]

या विदारक स्थितीवर उपाय म्हणून शाहू महाराज यांनी ३१ मार्च १९०५ रोजी विशेष सरकारी परिपत्रक काढले व त्याद्वारे असे जाहीर केले की, ज्या नोकरास पेन्शन देण्याचे अगर पेन्शन काढण्याचे असेल, त्याबद्दल त्यास तो रिटायर होण्यापुर्वी १ वर्ष किंवा सहा महिने पेन्शनीबद्दल काम चालून, पगाराचा दाखला वगैरे पेन्शन देण्यास लागणारी माहिती तयार करून काम पुरे करून द्यावेत. असा हुकूम काढला होता.[५५]

यावरून छत्रपती शाहूंचा दूरदृष्टीकोन, कर्तव्यदक्षता तसेच सहानुभूती पूर्वक दुसऱ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन दिसून येतो. छत्रपती शाहू महाराज यांनी प्रशासनात विविध सुधारणा केल्या होत्या. या सुधारणांच्यापाठीमागे महाराजांचा प्रमुख उद्देश असा होता की, प्रशासनातील उच्चवर्णीयांच्या अरेरावीला प्रतिबंध घालणे तसेच समाजातील मागास समाजाला समाजातील इतर प्रगत घटकांच्या बरोबरीने आणणे.

प्रशासनातील बेबंदशाही, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता दूर करणे, लोकाभिमुख, पारदर्शी स्वच्छ आणि कार्यक्षम प्रशासन निर्माण करण्याचा शाहूंनी प्रयत्न केला. या त्यांच्या प्रयत्नास बऱ्याच अंशी यश मिळाले. त्यामुळेच ते आदर्श प्रशासक म्हणून प्रसिद्ध झाले.

---

५४. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol- IV (1900-1905), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988 Page No.-20 (Introduction)

५५. कित्ता - पृ.क्र.२५६

## संदर्भ :


१. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), Early Administrative Reforms Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 1 (Introduction)

२. कित्ता

३. गर्गे स.मा. - करवीर रियासत, गो.ये.राणे प्रकाशन, पुणे, जुन १९८0,पृ.क्र.४१८- ४१९

४. कित्ता

५. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894- 1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1984 Page No.- 2 (Introduction)

६. कित्ता

७. कित्ता

८. कित्ता

९. कित्ता - पृ.क्र.६ (Introduction)

१0. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९

११. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 6 (Introduction)

१२. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९

१३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), Early Administrative Reforms Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 6 (Introduction)

१४. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६९

१५. कित्ता - पृ.क्र.७0

१६. कित्ता - पृ.क्र.७१

१७. Sangave Vilas - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-V (1906-1909), ( Foundation of development project and rise of sedition),ShivajiUniversity, Kolhapur,1992 P.No.- 20 (Introduction)

१८. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.८१

१९. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२00१, पृ.क्र.४१

२०. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 7 (Introduction)

२१. कित्ता

२२. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.८७

२३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 7 (Introduction)

२४. कित्ता - पृ.क्र.८ (Introduction)

२५. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.८०

२६. कित्ता - पृ.क्र.९६

२७. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), (Early Administrative Reforms) Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 8 (Introduction)

२८. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७, पृ.क्र.७०-७१

२९. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900), Early Administrative Reforms Shivaji University, Kolhapur 1983 Page No.- 9 (Introduction)

३०. कित्ता - पृ.क्र. 9 - 10 (Introduction)

३१. साळुंखे हिंदूराव - छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भंडार, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, जून १९९८, पृ.क्र.१७२

३२. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७, पृ.क्र.२४२

३३. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-VIII(1918-1919),(Impetus to social Ligislation and Non-Brahmin Movement Shivaji University, Kolhapur 2001 P.No.- 171

३४. कित्ता - पृ.क्र.१८७

३५. कित्ता - पृ.क्र.५६४

३६. Sangave Vilas– Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo- VI (1910-1913), (Intitiation of socio economic movements) Shivaji University, Kolhapur 1994 Page No.- 8, 9 (Introduction)

३७. येडेकर शाम - राजर्षी एक व्यक्तीदर्शन, सतीशचंद्र येडेकर कोल्हापूर पृ.क्र.३४ (विभाग तिसरा)

३८. Sangave Vilas – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VI (1910-1913),(Intitiation of socio economic movements) Shivaji Uni.,Kop. 1994 P.N..-10 (Introduction)

३९. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-IV (1900-1905), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988 Page No.-92

४०. कित्ता - पृ.क्र.२१ (Introduction)

४१. धाटावकर भास्कर - राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश – भाग १ ला, पुरालेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८८ पृ.क्र.१९

४२. कित्ता - पृ.क्र.३ (प्रस्तावना)

४३. कित्ता - पृ.क्र.२३

४४. येडेकर शाम - राजर्षी एक व्यक्तीदर्शन, सतीशचंद्र येडेकर कोल्हापूर पृ.क्र.१४ (विभाग तिसरा)

४५. धाटावकर भास्कर - राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश - भाग १ ला, पुरालेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८८ पृ.क्र.७१ - ७२

४६. कित्ता - पृ.क्र.७३

४७. कित्ता - पृ.क्र.११६-११७-११८

४८. कित्ता - पृ.क्र.११९

४९. कित्ता - पृ.क्र.१२४

५०. कित्ता - पृ.क्र.६०

५१. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VII (1914-1917),(Implemention of socio polotical schemes) Shivaji Uni.,Kop 1997 P.N. 376

५२. कित्ता - पृ.क्र.५५ (Introduction)

५३. कित्ता - पृ.क्र.४७८

५४. Sangave Vilas and Khane B.D. (Ed.) – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol- IV (1900-1905), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988 Page No.-20 (Introduction)

५५. कित्ता - पृ.क्र.२५६